**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ६२/२०१६-१७/१७७ दिनांक: ०६.०५.२०१७

**आदेश**
**आदेश केस क्र. ६२/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहसीन अन्सार मोमीन :<br>मु. पो. गट क्र. ४५३ नागांव<br>ता. हातकणंगले, जिल्हा. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, जयसिंगपूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग वडगांव | |

**कोरम:-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांनी दिलेल्या दिनांक २९-१२-२०१६ च्याआदेशाची वि.प.यांनी कार्यवाही करावी याबद्दल उपरोक्त तक्रारदार यांनी सदर प्रकरण या मंचाकडे दिनांक ०९-०३-२०१७ रोजी दाखल केले आहे.

**<u>संक्षिप्त स्वरुप.</u>**

२) तक्रारदार यांचे नावे गट क्र.४५३ आंबेडकरनगर , नागांव ता. हातकणंगले जि. कोल्हापूर या ठिकाणी वाणिज्य ग्राहक क्र. २५०३९०००२१११ ची वीज जोडणी चालू असून तेथे त्यांनी नॅशनल ट्रेडर्स या नावे व्यवसाय सुरु केला. तक्रारदार यांनी सदर ठिकाणी जादा १८ अश्वशक्ती वीज जोड मिळणेबद्दल आणि औद्योगिक दराने वीज आकारणी करणेबद्दल दि. २१-०३-२०१६ रोजी वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयाकडे अर्ज सादर केला. परंतु त्यांचा वाढिव वीजभार बराच काळ मंजूर झाला नाही व दर संकेतही बदलला नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी दि. २१-११-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. त्यामध्ये दि. २९-१२-२०१६ रोजी आदेश करणेत येऊन तक्रारदार यांची वाढिव १८ अवश्वशक्ती भाराची नोंद पुढील महिन्यात देयकात घेण्यात यावी, अतिरिक्त वाढिव भार एक महिन्यात मंजूर करणेत यावा आणि दरसंकेत बदलण्यासाठी दिलेल्या अर्जावर एक महिन्यात निर्णय घ्यावा असा निर्णय जाहिर झाला. कक्षाच्या सदर आदेशाची कार्यवाही केली नसल्याने तक्रारदार ंयानी या मंचाकडे सदरचे अपिल दाखल केले आहे.

**<u>वि. प. यांची भूमिका.</u>**

३) वि.प. तर्फे असे निवेदन सादर केले आहे की, तक्रारदार यांच्या वाढिव १८ अश्वशक्ती वीज भाराची नोंद डिसेंबर २०१६ च्या देयकात घेणेत आली आहे. दरसंकेत बदलाच्या अर्जात व्यावसायिक दर लागू करण्याची मागणी तक्रारदार यांनी केली आहे. वि.प. यांच्या म्हणण्यापमाणे तक्रारदार यांच्या शेडमध्ये ६० टक्के जागेत गोडावून आणि राहिलेल्या ४०टक्के जागेत यंत्र सामुग्री ठेवली आहे. वीजदर संकेत ठरवणेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. दिनांक २७-०३-२०१७ रोजी वाढिव वीजभार मंजूर करण्यात आला आहे. तक्रारदार यांनी योग्य पुरावे दिल्यास दर संकेत बाबत निर्णय करता येईल.

४) सदर प्रकरणाची सुनावणी या मंचासमोर दिनांक ०४-०५-२०१७ रोजी घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजरहोते. त्यांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले. वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री आर.बी. पाटील, यांचा युक्तिवाद ऐकणेत आला. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांनी या अपिलात केलेली मागणी मान्य करता येण्यासारखी आहे काय?
उत्तरः- होय.
२) कोणता अंतिम आदेश?
उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या दिनांक २९-१२-२०१६ च्या आदेशाची अंमजबजावणी करणेचा वि.प. यांना हुकुम व्हावा एवढीच विनंती तक्रारदार यांनी आपल्या अपिलात केलेली आहे. त्यामुळे , त्यांना वाणिज्य अथवा औद्योगिक या मधील कोणता दरसंकेत लागू होईल, त्यांचेकडून मागणी करण्यात आलेली सुरक्षा ठेवीची रक्कम २५००० रुपये योग्य की अयोग्य आहे या प्रश्नांचा तूर्त विचार करण्याची मंचास आवश्यकता वाटत नाही. या अपिलात तक्रारदार यांनी वि.प. यांच्या उपकार्यकारी अभियंता यांना दिनाक ०५-०४-२०१७ रोजी दिलेल्या अर्जाबाबत युक्तिवाद केला. परंतु त्यांचा सविस्तर विचार तूर्त करणेची गरज नाही.

७) तक्रारदार यांची वाढिव १८ अश्वशक्ती वीज भाराची नोंद पुढील महिन्याच्या देयकामध्ये घेणेत यावी या कक्षाच्या आदेशाची बजावणी केली आहे याबद्दल वाद नाही. तसेच अतिरिक्त वाढिव भार एक महिन्यात मंजूर करावा या सदर कक्षाच्या आदेशाची कार्यवाही करणेत आली आहे. परंतु सदरचा मंजूरी आदेश दिनांक २७-०३-२०१७ रोजी काढणेत आला.

८) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने, दरसंकेत बदलण्याकरीता दिलेल्या अर्जावर एक महिन्यात निर्णय घ्यावा असा आदेश केला होता. त्याची कार्यवाही अद्याप झालेली नाही. याबाबत आता निश्चित मर्यादेत निर्णय करणेत यावा असा आदेश करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे. त्याबद्दल , तक्रारदार यांना कागदपत्रांचा पुरावा द्यावयाचा असल्यास त्यांना तो मुदतीत सादर करणेस मुभा राहिल.

९) तक्रारदार यांची अपिल अर्जातील मागणी/विनंती वरील प्रमाणे अत्यंत मर्यादित स्वरुपाची असल्यामुळे युक्तिवादात सादर केलेल्या इतर गोष्टींवर तूर्त निर्णय देणे उचित समजत नाही. यावरुन अखेर खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

## आदेश

१) उपरोक्त तक्रारदार यांनी वाणिज्य दरसंकेत बदलून तो औद्योगिक दराने करणेत यावा. अशा आशयाच्या सादर केलेल्या अर्जावर वि.प. यांनी दिनांक ३१-०५-२०१७ पर्यन्त निर्णय करावा. त्या संदर्भात तक्रारदार यांना काही कागदोपत्री पुरावा वगैरे द्यावयाचा असल्यास तो दिनांक १९-०५-२०१७पर्यन्त वि.प. यांना सादर करावा.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |